## उपजिल्हाधिकारी यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ अन्वये.**

### प्राथमिक अधिसूचना

**जिल्हा अहमदनगर**

क्रमांक भूसं/कावि-२८/२०२०.— ज्याअर्थी, समुचित शासनाचे असे मत झाले आहे की, परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या जमिनी परिशिष्ट २ मध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत किंवा आवश्यक असण्याचा संभव आहे आणि ज्याअर्थी, समुचित शासनास भूमि संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळविण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ *(१)* अन्वये प्राथमिक अधिसूचना काढण्याचा अधिकार आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचे उक्त अधिनियमाच्या कलम ३ *(ई)* अन्वये आणि संबंधित जिल्हाधिकारी यांची महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना, दिनांक २७ ऑगस्ट २०१४ अन्वये समुचित शासन म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच सदर अधिसूचनेमधील नियम २ *(छ)* अन्वये जिल्हाधिकारी या शब्दाच्या व्याख्येत संबंधित उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांचा समोवश करण्यात आलेला आहे ;

त्याअर्थी, मी, पंकज चौबळ, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), क्रमांक १३, अहमदनगर चिलवडी येथील शाखा कालवा मौजे देशमुखवाडी, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर प्रकल्प याद्वारे उपरोक्त अधिनियमाच्या कलम ११ *(१)* अन्वये पुढीलप्रमाणे प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध करीत आहे.

(१) सोबत जोडलेल्या परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या जमिनी परिशिष्ट २ मध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत किंवा आवश्यक असण्याचा संभव आहे.

(२) सदर जमिनी सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित केल्यास एकही व्यक्ती / कुटुंब विस्थापित होणार नाही.

(३) भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळविण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (सुधारणा) अध्यादेश, २०१४, दिनांक ३१ डिसेंबर २०१४ अन्वये नव्याने समाविष्ट करण्यात आलेला कलम १० *(क)* अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ पायाभूत सुविधा व सामाजिक पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनासाठी उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ व ३ मधील तरतुदी लागू होणार नाहीत. सदरच्या भूसंपादनाचे प्रयोजन (चिलवडी शाखा कालव्याचे कि. मी. १० ते १५ वितरण व्यवस्था देशमुखवाडी कामाचे भूसंपादन) हे पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होत असल्याचे सदर प्रकरणी सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास करण्याच्या अटीतून सूट देण्यात येत आहे. (महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, २७ जानेवारी २०२०, असाधारण क्रमांक १३).

(४) सदर प्रकरणी एकाही व्यक्ती / कुटुंबाचे विस्थापन संपादन संस्थेच्या प्रस्तावात नमूद केल्यानुसार होत नसल्याने भूमि संपादन अधिनियम, २०१३ च्या कलम ४३ *(१)* अन्वये पुनर्वसन व पुनर्स्थापना प्रशासकाची नियुक्ती करण्याची आवश्यकता नाही. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ *(४)* अन्वये या अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या जमिनींचे जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय अन्य व्यक्तींस हस्तांतरण करण्यास किंवा सदर जमिनींमध्ये कोणताही हितसंबंध अथवा बोजा निर्माण करण्यास हितसंबंधित व्यक्तींना याद्वारे प्रतिबंध करण्यात येत आहे.

(५) उक्त अधिनियमाच्या कलम ११ *(५)* अन्वये जिल्हाधिकारी हे परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या जमिनींच्या भूमि अभिलेखांचे अद्ययावतीकरण करतील.

(६) संपादित करावयाच्या जमिनींचे क्षेत्र ठरविण्यासाठी समुचित शासनाने सामान्यत: अथवा विशेष प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास खालील बाबींचा अधिकार असेल.

(१) जमिनीमध्ये प्रवेश करणे, सर्वेक्षण करणे व मोजमाप घेणे.

(२) जमीन खणणे किंवा तिच्यामध्ये छिद्र घेणे.

(३) सदर जमीन अशा प्रयोजनासाठी योग्य आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी आवश्यक ती कामे करणे.

(४) सदर जमिनीत हद्दीत खुणा गाडणे व करावयाच्या कामाच्या हद्दीचे सीमांकन करणे.

(५) हद्दीच्या खुणाद्वारे स्तर, सीमा व रेषा चिन्हांकित करणे.

(७) सदर अधिसूचनेबाबत ज्या हितसंबंधित व्यक्तीस आपल्या लेखी हरकती नोंदवावयाच्या आहेत त्या अधिसूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ६० दिवसांच्या आत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), क्रमांक १३, वाडीया पार्क, टिळक रोड, अहमदनगर यांच्या कार्यालयात नोंदवाव्यात.

Scanned by CamScanner

## परिशिष्ट १

### जमिनींचे तपशील

जिल्हा अहमदनगर, तालुका कर्जत, गाव देशमुखवाडी

| गट नंबर | | संपादित करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | हे. आर |
| ३९ पै. | .. | ० ०८ |
| ३५/१ पै. | .. | ० १४ |
| ३५/२ पै. | .. | ० १५ |
| ३८ पै. | .. | १ ३४ |
| ३४ पै. | .. | ० ३१ |
| ३३ पै. | .. | ० ३२ |
| ३२ पै. | .. | ० १८ |
| ३१ पै. | .. | ० १८ |
| ३० पै. | .. | ० ०४ |
| ४१/१ पै., ४१/२ पै., ४१/३ पै., ४१/४ पै., ४१/५ पै., ४१/६ पै. | .. | १ ७१ |
| ४२/१ पै., ४२/२ पै. | .. | ० ०२ |
| १११ पै. | .. | ० २९ |
| ११० पै. | .. | ० ३२ |
| १०९ पै. | .. | ० ३० |
| १०८/२ पै. | पो. ख. .. | ० १५ |
| १०७/३ पै. | .. | ० १५ |
| १०६/२ पै. | पो. ख. .. | ० ११ |
| १२६ पै. | .. | ० ०१ |
| १२५ पै. | .. | ० ०७ |
| ११२/१ पै., ११२/२ पै. | .. | १ ६१ |
| ११६/१ पै. | .. | ० १६ |
| ११६/२ पै. | .. | ० १५ |
| १२४ पै. | .. | ० २६ |
| १२३ पै. | .. | ० २१ |
| ११७/१ पै. | .. | ० ०९ |
| ११७/२ पै. | .. | ० ०१ |
| ११८ पै. | .. | ० ६९ |

## परिशिष्ट १ — *चालू*

### जमिनींचे तपशील

| गट नंबर | | संपादित करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | हे. आर |
| १६२ पै. | .. | ० ३० |
| १६३ पै. | .. | ० ६० |
| १७६ पै. | .. | ० २१ |
| १७५ पै. | .. | ० ११ |
| १७४ पै. | .. | ० ६८ |
| १८६ पै. | .. | ० ३१ |
| १८८ पै. | .. | ० ७६ |
| १९१ पै. | .. | ० ७९ |
| १४५ पै. | .. | १ ५७ |
| १४६/२ पै. | .. | ० १७ |
| १४४/१ पै, १४४/२ पै., १४४/३ पै., १४४/४ पै., १४४/५ पै., १४४/६ पै. | .. | ० ३२ |
| १३८/१/३ पै. | .. | ० ८९ |
| १४३/१ पै. | .. | ० ३८ |
| १४३/२ पै. | .. | ० ४५ |
| २६० पै. | .. | ० ०२ |
| २५६ पै. | .. | ० ४८ |
| २५८ पै. | .. | ० १७ |
| २५७ पै. | .. | ० ३४ |
| २५५/१ पै. | .. | ० २७ |
| २५५/७ पै. | .. | ० ०६ |
| २५० पै. | पो. ख. .. | १ ८३ |
| ३४३/१ पै. ते ३४३/११ पै. | .. | १ ३२ |
| ३४४ पै. | .. | ० ३९ |
| ३५३ पै. | .. | ० ०४ |
| ३५४ पै. | .. | ० ३० |
| ३५१ पै. | .. | ० १९ |
| ३५२ पै. | .. | ० ४४ |

Scanned by CamScanner

परिशिष्ट १ — चालू

जमिनींचे तपशील

| गट नंबर | | संपादित करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | हे. आर |
| ३४७ पै. | .. | ० ७२ |
| ३४८ पै. | .. | ० ०२ |
| ३६२ पै. | .. | ० ०४ |
| ३४५ पै. | .. | २ ४३ |
| ४२६ पै. | .. | ० ४८ |
| रस्ता सरकारी | .. | ० १८ |
| ओढा | .. | ० १२ |

परिशिष्ट २

**प्रकल्पाचे नाव** : चिलवडी शाखा कालव्याच्या कि. मी. १० ते १५ कामाकरिता मौजे देशमुखवाडी, तालुका कर्जत येथील भूसंपादन.

परिशिष्ट ३

विस्थापनावावत तपशील

सदर प्रकल्पाच्या कामामुळे एकही व्यक्ती / कुटुंबाचे विस्थापन संपादन संस्थेच्या प्रस्तावात नमूद केल्यानुसार होणार नसल्याने विस्थापनाबाबत तपशील निरंक आहे.

परिशिष्ट ४

सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासाचे निष्कर्ष

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळविण्याचा वा पारदर्शकतेचा हक्क (सुधारणा) अध्यादेश, २०१४, दिनांक ३१ डिसेंबर २०१४ अन्वये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या कलम १० *(क)* नुसार सदरचा प्रकल्प हा पायाभूत सुविधा प्रकल्प असल्याने सदर प्रकरणी सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास करण्यापासून सूट देण्यात आली आहे. (महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, दिनांक २७ जानेवारी २०२०, असाधारण क्रमांक १३).

परिशिष्ट ५

प्रशासक नियुक्तीचा तपशील

प्रस्तुत प्रकरण एकही व्यक्ती / कुटुंब विस्थापित होत नसल्याने पुनर्वसन व पुनर्स्थापना प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

**पंकज चौबळ,**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
क्रमांक १३, अहमदनगर.

---

Scanned by CamScanner